# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990



Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com



लातूर वर्ष ३ रे अंक २०४ वा बुधवार दि.१० जानेवारी २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# नार्वेकर - एकनाथ शिंदे यांची निकालापूर्वीच भेट




मुंबई : शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणी निकाल देण्यापूर्वी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात झालेल्या भेटीवर शिवसेना उद्धव ठाकरे गटाने आक्षेप घेतला आहे. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने याबाबत सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.देशात लोकशाही आहे की नाही, हे ठरवणारा निर्णय असेल, असे उद्धव ठाकरे म्हणाले. बुधवारी शिवसेना अपात्रता प्रकरणी निर्णय येणार आहे. त्याबाबत उद्धव ठाकरे यांनी मत व्यक्त केले.जर न्यायमूर्ती (राहुल नार्वेकर) आरोपीला जाऊन भेटत असतील तर आम्ही त्या न्यायमूर्तींकडून काय अपेक्षा करावी? असा सवाल उद्धव ठाकरे गटाकडून उपस्थित करण्यात आला आहे. शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणी निकाल देण्यापूर्वी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात झालेल्या भेटीवर आक्षेप घेत उबाठा शिवसेनेने सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.हा खटला आहे तो देशामध्ये लोकशाही जिवंत राहणार की नाही? हे ठरवणारा निकाल असणार आहे. गेली दोन वर्षे त्यावर चर्चा, सुनावणी, उलट तपासणी सुरू आहे. गेल्या एप्रिलमध्ये सर्वोच्च न्यायालयाने योग्य वेळेत निकाल लावावा असे म्हटले होते. ३१ डिसेंबर तारीख दिली होती. ज्याप्रमाणे सुनावणी सुरू होती तेव्हाच आमच्या लक्षात आले होते की वेळकाढूपणा करत आहेत, असे उद्धव ठाकरे म्हणाले. उद्या दहा जानेवारीला ११:५९ पर्यंत वेळ खेचतील मग निकाल देतील असे वाटते, असेही ठाकरे म्हणाले. लवाद म्हणून अध्यक्ष महोदय दोन वेळेला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना घरी जाऊन भेटले आहेत. याचा अर्थ असा होतो की आरोपीच न्यायाधीशाला जाऊन भेटले. ते मुख्यमंत्र्यांना तसे भेटले तर हरकत नाही पण खटला सुरू असताना ते भेटले. आरोपीला घरी जाऊन भेटणार असतील तर कोणत्या न्यायाची अपेक्षा करणार, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

# आस्था दाखवा, आक्रमकता नको!

नवी दिल्ली : राम मंदिरातील प्राणप्रतिष्ठापना सोहळयासाठीची जय्यत तयारीही सुरु आहे. दरम्यान, राम मंदिरातील प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या मंत्रिमंडळातील मंर्त्यांना सक्त ताकिद दिली आहे.अयोध्येत होणा-या राम मंदिरातील प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याबाबत भाजपा आणि केंद्र सरकारमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे. तसेच या सोहळ्यासाठीची जय्यत तयारीही सुरु आहे. दरम्यान, राम मंदिरातील प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांना सक्त ताकिद दिली आहे. राम मंदिरातील प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यादरम्यान आस्था प्रदर्शित करा, मात्र आक्रमकता दिसता कामा नये, अशी सूचना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दिली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सरकारमधील मंत्र्यांना कुठल्याही प्रकारची विधाने करणे टाळण्याचा सल्ला दिला आहे. तसेच मंत्र्यांनी सरकारच्या मर्यादांचीही काळजी घ्यावी, असे नरेंद्र मोदी म्हणाले आहेत. मंत्र्यांनी राम मंदिराच्या प्राण प्रतिष्ठापना सोहळ्यादरम्यान, आपापल्या क्षेत्रांमध्ये कुठल्याही प्रकारची गडबड होणार नाही याची काळजी घ्यावी, असाही सल्ला दिला आहे.

२२ जानेवारीनंतर दर्शनाला या पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सांगितले की, आपापल्या क्षेत्रातील लोकांना २२ जानेवारीनंतरच रामलल्ल्यांच्या दर्शनाला घेऊन जा. दरम्यान, २२ जानेवारी रोजी राम मंदिराची प्राणप्रतिष्ठापना होणार आहे. त्यामध्ये देशातील निवडक लोकांना निमंत्रण देण्यात आले आहे. त्यानंतर मोठ्या प्रमाणावर लोक अयोध्येत येण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी अशी सूचना दिलेली आहे.

# दिल्लीच्या बदल्यात तीन राज्यांत अधिक जागांची आपची काँग्रेसकडे मागणी



नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीसाठी इंडिया आघाडीतील घटक पक्षांनी आता जागावाटपाबाबत चर्चा सुरू केली आहे. सोमवारी काँग्रेस आणि आम आदमी पक्षाच्या नेत्यांनी बैठक घेऊन जागावाटपाच्या फॉर्म्युल्याबाबत चर्चा केली. यावेळी दोन्ही पक्षांनी आपल्या आमदार आणि खासदारांच्या संख्येच्या प्रमाणात भागीदारी देण्याचा प्रस्ताव ठेवला. याचवेळी आपने गुजरात, हरियाणा आणि गोव्यामध्ये जागा देण्याची मागणी केली. मात्र सध्या दोन्ही पक्षांमध्ये कुठलाही समाधानकारक फॉर्म्युला निघालेला नाही. म्हणजेच दोन्ही पक्षातील नेते, पुन्हा चर्चा करणार आहेत.

तसेच जागावाटपाबाबतचा अंतिम निर्णय घेणार आहेत. काँग्रेस आणि आपच्या नेत्यांमध्ये झालेल्या बैठकीत काँग्रेसच्या नॅशनल अलायन्स समितीचे प्रमुख मुकुल वासनिक, अशोक गहलोत यांच्यासह जागावाटप समितीचे सदस्य सहभागी झाले होते. तर आम आदमी पक्षाचे प्रतिनिधित्व खासदार संदीप पाठक, आतिशी मार्लेना आणि सौरभ भारद्वाज यांनी केले. मात्र या बैठकीत झालेल्या चर्चेबाबत कुठलीही माहिती प्रसारमाध्यमासमोर आलेली नाही. पण सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार आम आदमी पक्षाने दिल्लीमध्ये कांग्रेसला लोकसभेच्या तीन जागा देण्याचा प्रस्ताव दिला आहे. दिल्लीमध्ये लोकसभेच्या ७ जागा असून, २०१४ आणि २०१९ मध्ये दिल्लीतील सर्वच्या सर्व जागांवर भाजपाने विजय मिळवला होता. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला दिल्लीमध्ये ५६ टक्के मते मिळाली होती. तर काँग्रेसला २२ आणि आम आदमी पक्षाला १८ टक्के मते मिळाली होती. दिल्लीतील सातही लोकसभा मतदारसंघामध्ये आप आणि काँग्रेसच्या मतांची बेरीज ही भाजपाच्या उमेदावारांन मिळालेल्या मतांपेक्षा अधिक नव्हती.दिल्लीप्रमाणेच पंजाबमध्ये आपने काँग्रेसला ६ जागा देण्याची तयारी दर्शवली आहे. पंजाबमध्ये लोकसभेच्या एकूण १३ जागा आहेत. म्हणजेच दिल्ली आणि पंजाबमध्ये आप काँग्रेससोबत जागावाटपामध्ये ५०-५० चा फॉर्म्युला वापरण्यास तयार आहे. मात्र यातही स्वत:ला मोठ्या भावाच्या रूपात ठेवण्याचा आपचा प्रयत्न असेल. याशिवाय आम आदमी पक्षाने गुजरातमध्ये एक, हरियाणामध्ये तीन आणि गोव्यामध्ये एका जागेची मागणी केली आहे. गुजरातमध्ये लोकसभेच्या २६ जागा असून, मागच्या दोन निवडणुकांमध्ये येथे भाजपाने सर्वच्या सर्व जागा जिंकल्या होत्या. दरम्यान, आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी गुजरातमधील भरूच लोकसभा मतदारसंघातून चैतर वसावा यांच्या उमेदवारीची घोषणा केली आहे.

# श्रीराम सर्वांचे, निमंत्रण मिळाले तर जाणार



पाटणा : अयोध्येतील राम मंदिरात रामलला प्राणप्रतिष्ठा सोहळ्याची जय्यत तयारी सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह सुमारे ७ ते ८ हजार मान्यवरांना निमंत्रण देण्यात आले आहे. मात्र, राम मंदिरावरून तसेच निमंत्रणे देण्यावरून विरोधक केंद्र सरकारवर टीका करताना दिसत आहेत. राम मंदिराच्या सोहळ्याला जायचे की नाही, यावरून विरोधकांच्या इंडिया आघाडीमध्ये संभ्रम आहे. यातच बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या जदयू पक्षातील मंत्र्यांनी मात्र वेगळी भूमिका घेतली असून, निमंत्रण दिल्यास राम मंदिर सोहळ्याला जाणार असल्याचे म्हटले आहे. जदयू नेते केसी त्यागी यांनी यावर भाष्य करताना सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानंतर राम मंदिर बांधले जात आहे. हे मंदिर कोणत्याही राजकीय पक्षाने बांधलेले नाही. निमंत्रित केले या सोहळ्याला उपस्थित राहण्यासाठी पक्षाकडून प्रतिनिधी पाठवायला हरकत नाही. प्रभू श्रीराम सर्वांचे आहेत. आम्ही सर्व धर्मांचा आदर करतो. अयोध्या मंदिराच्या उद्घाटन समारंभाला उपस्थित राहण्याचे आमंत्रण मिळाल्यास आम्ही निश्चितपणे कोणाला तरी उपस्थित राहण्यासाठी पाठवू, असे केसी त्यागी यांनी म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालयात प्रकरण प्रलंबित असतानाही आम्ही न्यायालयाचा आदेश मान्य करू, असे सांगितले होते.

आता हे प्रकरण निकाली निघाल्यानंतर मंदिर बांधले गेल्याने आम्ही त्याचा आदर करतो. २२ जानेवारीला अयोध्येला कोण जाणार याने काही फरक पडत नाही. जर निमंत्रण नसेल तर आम्ही आमच्या वेळेनुसार तिथे जाऊ, असे केसी त्यागी यांनी स्पष्ट केले. दरम्यान, आम्ही सर्व धर्मांचा आदर करतो, असे आम्ही सातत्याने सांगत आलो आहोत. अयोध्या मंदिराच्या मुद्द्याचे राजकारण करण्याचे जे प्रयत्न केले जात आहेत त्याचे आश्चर्य वाटते. आता वेळ आली आहे की, भाजपाने मंदिर आणि धर्म यांचा वापर निवडणुकीची हत्यार म्हणून करणे थांबवावे.

# आ. रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत इंदरठाणा येथील अनेकांचा भाजपात प्रवेश




लातूर दि.०९- भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून रेणापूर तालुक्यातील मौजे इंदरठाणा येथील मुस्लिम बांधवांसह अनेकांनी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला. नव्याने प्रवेश घेतलेल्या सर्वांचा पक्षात मान सन्मान केला जाईल असे यावेळी आ. कराड यांनी बोलून दाखविले.

लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून होत असलेल्या विविध विकास कामाला प्रेरित होऊन त्यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून रेणापूर तालुक्यातील मौजे इंदरठाणा येथील अनेकांनी भाजपात जाहीर प्रवेश केला यावेळी भाजपाचे अल्पसंख्यांक आघाडीचे जिल्हाध्यक्ष रशीद पठाण, भाजपाचे तालुकाध्यक्ष अँड. दशरथ सरवदे, जिल्हा उपाध्यक्ष अनिल भिसे, भागवत सोट, सांगायो समितीचे अध्यक्ष वसंत करमुडे, अल्पसंख्यांक आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष वाजिद पटेल, अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष जलील शेख, इंदरठाणा येथील सरपंच अविनाश रणदिवे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

आ. रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत इंदरठाणा येथील शेख जमाल, कमाल पटेल, शेख इरफान पाशु पटवारी, शेख फारुख, नसीर पटेल, शेख रफिक पटेल, शेख लुकमान रशीद पटेल, सय्यद मोहसिन गफूर, सय्यद निजाम शमशोद्दीन, सय्यद वाजीद जमीर, सय्यद आयुब नूर, सय्यद सरदार अहमद, सय्यद रहीम जमीर, सय्यद नय्यूम काशिम, सय्यद जैनुद्दीन बशीर, सय्यद सोहेल अनूतालिब, गौतम लक्ष्मण जोगदंड, रामलिंग अंकलकोटे, कल्याण पंढरी घोडके, शेख इमरान, शेख असिफ, कोटमाळे सुग्रीव, दैवशाला गौतम जोगदंड, मीना सतीश रणदिवे, अंजना नंदू रणदिवे, सखुबाई सुरेश रणदिवे, पल्लवी अक्षय रणदिवे यांच्यासह अनेकांनी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.

# मतदारांच्या जनजागृतीसाठी जिल्ह्यात विविध कार्यक्रमाचे आयोजन




लातूर, दि. ९ (जिमाका): लातूर जिल्ह्यातील नवमतदारांना तसेच ज्यांचे वय मतदार व्हायच्या टप्प्यात आहे, अशा युवक, युवतींना मतदानाचे महत्व कळावे, यासाठी पद्धतशीर मतदारांचे शिक्षण आणि निवडणूक सहभाग कार्यक्रम (स्वीप) अंतर्गत चुनावी पाठशाळा, वेगवेगळ्या जिंगल्स, मतदान जनजागृतीसाठी काव्यलेखन स्पर्धा असे उपक्रम घ्यावेत, अशा सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित 'स्वीप' संदर्भातील बैठकीत त्या बोलत होत्या. आगामी सार्वत्रिक लोकसभा निवडणूक -२०२४ च्या अनुषंगाने स्वीप अंतर्गत जिल्हा कृती आराखडा घ्या निमित्ताने सर्व विभाग प्रमुखांची बैठक घेण्यात आली. लोकसभा निवडणूक २०१९ मध्ये ज्या मतदान केंद्रावर कमी मतदान झाले आहे. तेथे मतदानाची टक्केवारी आगामी सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४ मध्ये वाढेल यासाठी प्रयत्न करावे. भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार महिला मतदार, नवतरुण मतदार तसेच दिव्यांग मतदार यांना निवडणूक प्रक्रियेत जास्तीत जास्त सहभागी करून घ्यावे. यासाठी स्वीप उपक्रमाच्या माध्यमातून सर्व विभागाच्यावतीने प्रयत्न करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या. उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुचिता शिंदे, सामान्य प्रशासनचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी नितीन दाताळ, पंचायतचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गिरी, जिल्हा नगरपरिषद प्रशासन सहआयुक्त रामदास कोकरे, प्राथमिकच्या शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक एम.एस. पटेल, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, नायब तहसिलदार (निवडणूक) पंकज मंदाडे, नायब तहसीलदार (करमणूक कर) परवीण पठाण नायब, वृशीप अर्थ फाऊंडेशनचे जिल्हा समन्वयक आकाश सोनकांबळे उपस्थित होते.

## संपादकीय....

# टिंबाएवढ्या मालदीवचे दिवटे

मोदींचा अपमान झाल्यानंतर एका प्रवासी कंपनीने मालदीवचे बुकिंग थांबवले. मात्र, हजारो विमान तिकिटे किंवा तेथील हॉटेलांचे बुकिंग रद्द झाल्याच्या ज्या बातम्या व आकडे फिरत आहेत; त्यातील नेमके तथ्य समजायला वेळ लागेल. हे आकडे अतिरंजित असू शकतात.पाच-सात लाख लोकसंख्येच्या, पाण्यापासून संरक्षणापर्यंत आणि पर्यटनापासून एकूण अर्थव्यवस्थेपर्यंत परावलंबी असणाऱ्या एखाद्या टिंबाएवढ्या देशाच्या राज्यकर्त्यांना किती अहंकार असावा आणि त्यांनी किती तोंडाळपणा करावा; याला नियतीनेच मर्यादा घालून ठेवल्या आहेत. मालदीवच्या तीन उपमंत्र्यांनी बहुधा त्या विसरून भारतावर दुगाण्या झाडल्या. ते तिघेही आता घरी गेले आहेत आणि दिल्लीत मालदीवच्या राजदूतांना परराष्ट्र खात्यात बोलावून समज देण्यात आली आहे. हा विवाद सुरू झाला तो पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लक्षद्वीप भेटीची काही छायाचित्रे समाजमाध्यमांमध्ये प्रसारित केल्यानंतर.लक्षद्वीप बेटांचा समूह हा केंद्रशासित प्रदेश नितांत सुंदर असून पर्यटनाच्या विकासासाठी मोदी यांनी नागरिकांचे लक्षद्वीपकडे लक्ष वेधणे चूक नव्हते. ते गेले काही दिवस या विषयात लक्ष देत आहेत. भारतीय श्रीमंतांनी परदेशांत विवाह सोहळे करण्याऐवजी उत्तराखंडासारख्या राज्यात का करू नयेत, असे पंतप्रधान म्हणाले होते. यानंतर ज्या देशांमध्ये असे सोहळे होतात, त्यांनी मोदींना शिव्यांची लाखोली वाहिली नाही. सुसंस्कृत राजनीतीत असे करत नाहीत. मुळात लक्षद्वीपचे कौतुक मालदिवी मंत्र्यांच्या डोळ्यांत खुपण्याचे कारण नाही. आजही मालदीवची एक तृतियांश अर्थव्यवस्था पर्यटनावर अवलंबून आहे. त्यातला सर्वाधिक वाटा भारतीयांचा आहे. दरवर्षी अंदाजे वीस ते बावीस लाख भारतीय मालदीवला जातात आणि लक्षावधी डॉलर तिजोरीत ओततात. लक्षद्वीप बेटांवर मालदीवइतक्या सुविधा अजून नाहीत. लक्षावधी पर्यटक हाताळण्याची क्षमता यायला अवकाश आहे. तेव्हा मोदींच्या एका 'फोटो शूटआऊट'ने अस्वस्थ होण्यासारखे काहीच नव्हते. पण हे केवळ निमित्त करण्यात आले.मालदीवचे नवे अध्यक्ष महंमद मुइझ्झू सत्तारूढ झाल्यापासून कटकटींना सुरुवात झाली आहे. ते भारतद्वेष्टे तर आहेतच, पण भारताला पर्याय म्हणून चीनशी मैत्री वाढविण्याची त्यांची योजना आहे. सध्या मुइझ्झू चीनच्या भेटीवर आहेत आणि या भेटीत चीन सवलती आणि कर्जांची खैरात केल्याशिवाय राहणार नाही. नेपाळ, भूतान, श्रीलंका, मालदीव आणि बऱ्याच प्रमाणात बांगलादेश हे भारताचे अंकित नसले तरी त्यांचे आर्थिक-सामाजिक स्थैर्य भारतावर अवलंबून आहे. त्यांचे आणि भारताचे नाते अनेक शतकांचे व जैविक आहे. चीनला हे सगळे समीकरण मोडून काढायचे आहे. दक्षिण आशिया कह्यात आणायचा आहे. चीनच्या या 'गेम'मधील मालदीव हे छोटे पण महत्त्वपूर्ण प्यादे आहे. मालदीवचे भारतद्वेष्टे अध्यक्ष चीनला जाण्यापूर्वी तीन उपमंत्री भारताबद्दल आणि पंतप्रधानांबद्दल वाह्यात बोलतात, हा योगायोग नसतो. या मंत्र्यांवर झालेली कारवाईही तोंडदेखली असू शकते. भारत कितपत तीव्र प्रतिक्रिया देतो, याचा अंदाज घेण्यासाठीही या मंत्र्यांनी जिभा सैल सोडल्या असतील. मात्र, एकदा निषेध नोंदविल्यावर आणि समज दिल्यावर हा विषय खूप ताणून धरणे योग्य होणार नाही. तेथेही कधीतरी सत्तांतर होईल आणि तेथील विरोधी पक्षांचे नेते, लोकप्रतिनिधी भारताच्या बाजूने बोलत आहेत. त्यांची आणि सामान्य मालदिवी नागरिकांशी असणारी मैत्री महत्त्वाची आहे.मोदींचा अपमान झाल्यानंतर एका प्रवासी कंपनीने मालदीवचे बुकिंग थांबवले. मात्र, हजारो विमान तिकिटे किंवा तेथील हॉटेलांचे बुकिंग रद्द झाल्याच्या ज्या बातम्या व आकडे फिरत आहेत; त्यातील नेमके तथ्य समजायला वेळ लागेल. हे आकडे अतिरंजित असू शकतात. मालदीववर असा बहिष्कार टाकून धडा शिकविणे, हे अंतिमत: आपल्या हिताचे ठरेल का, याचाही विचार करावा लागेल. १९८८ मध्ये मालदीवमध्ये सशस्त्र बंडाळी झाली तेव्हा भारतीय जवानांनी धाव घेऊन तिथले सरकार वाचविले होते. तिथली पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी भारताने मालवाहू विमाने आणि जहाजे धाडली होती. या उपकारांची जाणीव मुइझ्झू यांना नसली तरी तिथल्या नेत्यांना आणि लोकप्रतिनिधींना आहे. मोठ्या देशांना वाकुल्या दाखवून किंवा ब्लॅकमेल करून अधिकाधिक सवलती, कर्जे पदरात पाडून घेण्याची छोट्या, गरीब देशांची रीतच असते. यातून ते आपली उपयुक्तता आणि संभाव्य उपद्रवक्षमता दाखवून देतात. त्यांना कधी सवलतींची गाजरे तर कधी दोन-चार तडाखे अशा दुहेरी नीतीनेच सांभाळावे लागते. जास्तीत जास्त देशांच्या जमिनी, जल आणि आकाश व्यापण्याचा भस्म्या रोग चीनला पूर्वीच जडला आहे. नाहीतर मुइझ्झू यांनी पाच दिवस चीनमध्ये मुक्काम करून अनेक करार करण्याचे काहीच प्रयोजन नाही. 'मालदीवला आपण बरोबरीच्या नात्याने वागवतो आणि मालदीवच्या सार्वभौमतेचा आदर करतो,' हा चीनने भारताला मारलेला टोमणा आहे. भारताने मालदीवमधून सैन्य मागे घ्यावे, अशी मागणी अध्यक्ष मुइझ्झू करीत असतात. सैन्य म्हणजे तेथे आपले केवळ ७७ जवान आहेत! चीनभेटीनंतर मुइझ्झू काय बोलतात, तेथे किती करार करतात आणि त्यांचे दिवटे मंत्री मंत्रिमंडळात कधी परत येतात, यावर द्विपक्षीय संबंधांचा पुढचा प्रवास अवलंबून आहे.

# अर्थभरारी!

खरं तर मागच्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत शेती, व्यापार, हॉटेल व्यवसाय, वाहतूक आणि दळणवळण या देशातल्या महत्त्वाच्या मानल्या जाणा-या क्षेत्रांची वाढ ही चालू आर्थिक वर्षात मंदावली आहे. गेल्या आर्थिक वर्षात या क्षेत्रांनी १४ टक्के एवढी भरघोस वाढ नोंदविली होती. ती चालू वर्षात निम्मीच राहील असा राष्ट्रीय सांख्यिकी विभागाचा (एनएसओ) अंदाज आहे. तरीही भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचे रिझर्व्ह बँकेच्या अंदाजासह सर्व जागतिक अंदाज बाजूला सारून एनएसओने भारताच्या वृद्धीदराचा ७.३ टक्के दर अपेक्षित असल्याचे म्हटले आहे.

कोरोनाच्या जागतिक संकटानंतर रशिया-युक्रेन युद्ध व त्यात आता इस्रायल-हमास युद्धाची पडलेली भर यामुळे जागतिक अर्थकारण संकटात सापडलेले आहे व त्यातून सावरताना अमेरिकेसह श्रीमंत मानल्या जाणा-या युरोपीय देशांना मोठी कसरत करावी लागते आहे. मात्र, भारतीय अर्थव्यवस्था केवळ कोरोना संकटावर मात करून सावरलीच नाही तर तिने जोरदार उसळी घेतली आहे. २०२३-२४ मध्ये सा-या जगाचा वृद्धीदर २.४ टक्क्यांवरून २.७ टक्क्यांवर जाईल. मात्र, त्याचवेळी भारताचा समावेश असलेल्या दक्षिण आशियाचा वृद्धीदर ५.२ टक्के असेल व अर्थातच त्यात भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा सर्वांत मोठा वाटा असेल. हे चित्र येथून पुढे आणखी काही वर्षे कायम राहण्याचीही शक्यता तज्ज्ञ वर्तवित आहेत. हा चमत्कारच मानायला हवा. कारण यावर्षी मान्सून फारसा समाधानकारक न राहिल्याने अर्थव्यवस्थेत सर्वांत मोठा वाटा असलेल्या कृषी क्षेत्राचा वृद्धीदर हा जेमतेम १.८ टक्के एवढा राहण्याचा अंदाज आहे. हा एका दृष्टीने नीचांकच आहे. सर्वांत मोठा वाटा असूनही भारतीय कृषी क्षेत्राला नावीन्याचा वा अत्याधुनिकीकरणाचा स्पर्श अद्यापही झालेला नाही. विद्यमान सरकारने भलेही देशातील शेतक-यांचे उत्पन्न दुप्पट करण्याची घोषणा केलेली असली तरी दहा वर्षांच्या कालावधीनंतरही या घोषणेच्या उद्दिष्टपूर्ततेची प्रतीक्षाच आहे. या उद्दिष्टपूर्ततेसाठी आवश्यक धोरण राबविणे दूरच उलट ही उद्दिष्टपूर्ती कधीच होणार नाही, असे निर्णय विद्यमान सरकारने घेतल्याने शेतकरी जास्त अडचणीत येतो आहे. टोमॅटो निर्यातीवर बंदी, कांदा निर्यातीवर बंदी, साखर निर्यातीवर बंदी, तांदूळ निर्यातीवर बंदी, खाद्यतेलावरील आयात शुल्क नगण्य करून तेलाची आयात मोठ्या प्रमाणावर वाढविण्याचा निर्णय, तुरीसह सर्व डाळींची मोठ्या प्रमाणावर आयात हे सगळे निर्णय सरकारच्या शेतक-यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या स्वत:च्याच निर्णयाला उभा छेद देणारेच! मात्र, मतांचे राजकारण डोळ्यासमोर ठेवून महागाई नियंत्रणाचे कारण पुढे करत सरकार हे निर्णय बिनदिक्कत घेते. त्यातून देशातील सर्वच शेतमालाचे दर पडले आहेत व शेतक-यांचा उत्पादन खर्चही निघणे मुश्कील बनले आहे. त्यातच देशाच्या अर्ध्या भागात अतिवृष्टी तर अर्ध्या भागात दुष्काळ आहे.

त्यामुळे शेतक-यांचे उत्पादन निम्म्यावर आले आहे. ही परवड कायम असूनही देशाच्या अर्थव्यवस्थेची अर्थभरारी होते आहे. ही परवड सरकारने योग्य धोरणे आखून दूर केली तर अर्थभरारीचे रुपांतर अर्थ उड्डाणात व्हायला वेळ लागणार नाही. असो! मूळ मुद्दा हा की, देशाच्या अर्थव्यवस्थेत मोठा वाटा असणा-या क्षेत्रांचा वृद्धीदर मंदावलेला असतानाही अर्थव्यवस्थेने भरारी घेण्याचा चमत्कार घडला कसा? या प्रश्नाचे उत्तर गृहबांधणी व विक्री, वित्तीय सेवा, व्यावसायिक सेवा, पायाभूत सोयीसुविधांमध्ये होत असलेली वाढ व विस्तार, खाण व विद्युत क्षेत्राने नोंदविलेली वाढ आदी बाबींमध्ये दडलेले आहे. आकडेवारीतच बोलायचे तर चालू आर्थिक वर्षात 'एकूण देशांतर्गत उत्पन्न' म्हणजे जीडीपी १७१ लाख कोटींवर पोहोचू शकतो. हा आकडा मोठा आहे व एनएसओच्या आधीच्या अंदाजापेक्षा १२ लाख कोटी जास्त आहे. २०११-१२च्या आधारभूत किमतीवर आधारित ही आकडेवारी आहे. या वाढीचे प्रमुख कारण दडले आहे ते देशांतर्गत बाजारपेठेत असणारी वस्तू व सेवा यांच्यासाठी प्रचंड वेगाने वाढत असलेली मागणी! अर्थात आपल्या जगात



प्रथम क्रमांकावर पोहोचलेल्या अवाढव्य लोकसंख्येचा यात सर्वांत मोठा वाटा आहे. देशांतर्गत बाजारपेठ व वाढती मागणी याचा भक्कम अर्थवाढीत मोठा वाटा असतो. यामुळे अर्थव्यवस्थेला एक प्रकारे स्थैर्य मिळते. या स्थैर्यातून विकासाची वाटचाल सोपी होते. खरं तर विद्यमान सरकारची अर्थधोरणातील उणे गती पाहता ही वाढ म्हणजे सरकारसाठी लागलेला जॅकपॉटच आहे. त्यात जागतिक बाजारपेठेत मागच्या दहा वर्षांत नीचांकी पातळीवर राहिलेल्या कच्च्या तेलाच्या दराचा सर्वांत मोठा वाटा आहे. या नीचांकी दराने सरकारचा इंधन आयातीवरील लाखो कोटींचा खर्च वाचला आहे. तर दुसरीकडे कच्च्या तेलाचे दर कमी असले तरी देशातील पेट्रोल, डिझेलचे चढे दर कायमच आहेत. तेल कंपन्या हे दर जागतिक बाजारातील दरावर निश्चित करत असल्याचा दावा करीत असल्या तरी मागच्या काही महिन्यांत तेल कंपन्यांनी कमावलेल्या नफ्याचे आकडे या दाव्याला छेद देणारेच आहेत. असो! लोकसंख्येच्या बळावर देशाची अर्थव्यवस्था भरारी घेते आहे. चीनच्या भरारीचीही अशीच सुरुवात झाली होती. आजही भारताच्या तुलनेत चिनी अर्थव्यवस्था प्रचंड मोठी आहेच. मात्र, राज्यकर्त्यांच्या चुकीच्या धोरणांमुळे चीनच्या अर्थव्यवस्थेची गती आता मंदावते आहे. पुढचे दशक-दीड दशक वेगाने विकसित होऊ शकणा-या भारताने चीनच्या चुकांमधून बोध व शहाणपणा घ्यायला हवा व योग्य धोरणे राबवायला हवीत. धोरणात योग्य पारदर्शकता असल्याशिवाय भारतीय अर्थव्यवस्थेची ही भरारी दीर्घायुषी व भक्कम बनणार नाही. भारतात हे वर्ष निवडणुकांचे वर्ष आहे. त्यामुळे साहजिकच राज्यकर्ते 'होऊ दे खर्च'च्या मानसिकतेत असणार हे उघड आहे. त्यामुळे अर्थभरारीला या वर्षात आणखी झळाळी येण्याची शक्यता आहे. त्यातच येत्या २२ जानेवारी रोजी अयोध्येत राम मंदिराचे उद्घाटन होणार आहे. त्यामुळे एकट्या जानेवारीत ५० हजार कोटी रुपयांची वाढीव उलाढाल देशात होण्याचा अंदाज आहे. हा वेग पुढे वाढू शकतो. धार्मिक पर्यटनातून उलाढाल वाढीचे हे नवे मॉडेल भारतात रुजू होण्याची चिन्हे आहेत. त्यातून अर्थव्यवस्थेच्या भरारीला बळच मिळणार आहे. अर्थात अर्थव्यवस्था भरारी घेतेय म्हणून देशाचा समतोल व सर्वांगीण विकास होईलच असे समजणे भाबडेपणाचेच! कारण बहुतांशवेळा अशी अर्थभरारी ही देशातील विषमतेची दरी आणखी रुंदावणारीच ठरते व या अर्थभरारीचा सामान्यांना काहीच फायदा होत नाही. तो तसा होत नसेल तर या अर्थभरारीला काहीही अर्थ राहात नाहीच! अर्थभरारीला खरा अर्थ प्राप्त करायचा असेल तर या भरारीची फळे सामान्यांच्या ताटात पडून देशाचा सर्वांगीण विकास करण्याचा परमार्थ साधणारी धोरणे राज्यकर्त्यांना राबवावी लागतील तरच ही अर्थभरारी शाश्वत व टिकाऊ ठरेल, हे मात्र निश्चित!


# पर्यटन उद्योग आणि अर्थव्यवस्था

पर्यटन हे आर्थिक विकास आणि रोजगारनिर्मितीचे सक्षम माध्यम मानले जाते. पर्यटन क्षेत्र हे देशातील सर्वोच्च सेवा उद्योगांपैकी एक आहे. आजच्या काळात अर्थव्यवस्था मजबूत करणे ही प्रत्येक देशाची पहिली गरज आहे. आज जगात अनेक देशांची अर्थव्यवस्था पर्यटन उद्योगाभोवती फिरते. भारताच्या जीडीपीमध्ये पर्यटन क्षेत्राचा ६.२३ टक्के वाटा आहे तर एकूण रोजगारामध्ये ते ८.७८ टक्के योगदान देते. २०२२ मध्ये सुमारे ६२ लाख परदेशी पर्यटकांनी भारताला भेट दिली. देशातील पर्यटनाला चालना देण्यासाठी शासनाने पर्यटन धोरण २०२३ तयार केले असून त्याला भरभरून प्रतिसाद मिळाला आहे. २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्यात पर्यटन उद्योगाचा विकास मोठी भूमिका बजावेल.

र्यटनाला सर्व जगात अगदी प्राचीन काळापासून महत्त्व दिले गेले आहे. अगदी १५व्या, १६व्या शतकात भारत बघायला आलेल्या अनेक दर्यावर्दी पर्यटकांची माहिती आपण इतिहासात वाचलेली आहे. हे पर्यटक जरी व्यापारी संधी शोधण्याकरिता किंवा व्यापार वाढवण्याकरिता आले असले तरी त्यामध्ये भारत देश कसा आहे, इथले लोक कसे आहेत हे बघण्याचे आकर्षण हे देखील त्यामागचे एक कारण होते. आपल्या भारतात अनेक कथांतून तीर्थयात्रेचे संदर्भ दिसून येतात. अगदी अलीकडच्या काळातही तीर्थयात्रा केल्या जातात. यामागे मुख्य उद्देश जरी देवदर्शन हा असला तरी त्यानिमित्ताने केल्या जाणा-या पर्यटनाचा उपयोग नवीन स्थळे, ठिकाणे पाहण्याकरिताही होतो. पर्यटनाचे आकर्षण हे नवीन नक्कीच नाही. भारतातील देवस्थाने बघितली तर असे दिसून येईल आणि असे म्हणता येईल की लोकांना पर्यटनासाठी प्रोत्साहित करण्यासाठी चांगल्या अशा पर्यटनाच्या ठिकाणी मुद्दाम देवालये, तीर्थस्थाने बांधली गेली आणि देवदर्शनाच्या निमित्ताने लोकांचे पर्यटन घडले आणि घडते.

मुळात कोणत्याही देशाला आणि त्याच्या अर्थव्यवस्थेला पर्यटन आणि पर्यटक हे नेहमीच हवेहवेसे वाटतात. कारण या पर्यटकांमुळे आणि त्यांच्या पर्यटनामुळे अनेक रोजगार उत्पन्न होतात. देशातील हस्तकला, पारंपरिक कलाकुसर, व्यापार यांना चालना मिळते, उत्पन्न मिळते. आतिथ्य उद्योगाला ग्राहक मिळतात. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे देशाला परकीय चलन मिळते जे भारतासारख्या देशाला खूप महत्त्वाचे आहे. पर्यटन हे जगातील प्रत्येक माणसाला हवेहवेसे वाटते; किंबहुना ती प्रत्येक माणसाची गरज आहे. प्रत्येक व्यक्ती जशी जमेल तशी ही गरज पूर्ण करते. त्यामुळे पर्यटनक्षेत्राला मागणी भरपूर आहे आणि जो ही मागणी योग्य रीतीने शोषण करेल त्याला या व्यवसायात लाभही भरपूर आहे असे म्हणता येईल. भारतात पर्यटनाच्या अफाट संधी आहेत. बर्फाच्छादित पर्वतांपासून ते महासागरात पसरलेल्या बेटांपर्यंत. पर्यटन क्षेत्र विविधतेने नटलेले आहे. भारताला समृद्ध सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा आहे. त्यामुळेच पर्यटन उद्योग नवीन अवकाश शोधत आहे. या उद्योगात खासगी क्षेत्राचा ८० टक्के सहभाग आहे, मात्र या अनुकूल वातावरणाबरोबरच सुरक्षा, दक्षता, वाहतूक व्यवस्था आणि स्वस्त वाहतूक सुविधाही आवश्यक आहेत. यासाठी नवीन विचार घेऊन पुढे जाण्याची गरज आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकारे पर्यटन उद्योगाची व्याप्ती वाढवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत. कोरोना महामारीनंतर आता पुन्हा एकदा भारतातील पर्यटन वेगाने वाढू लागले आहे.

पर्यटन हे कोणत्याही देशासाठी आर्थिक सुव्यवस्थेचे एक शक्तिशाली माध्यम आहे. जगाच्या पाठीवर अनेक देशांनी केवळ पर्यटनाच्या आधारावर आपल्या अर्थव्यवस्थांचा भरीव विकास करून जगासमोर आदर्श घालून दिला आहे. यासाठी रस्तेसेवा, विमान वाहतूक, जलवाहतूक यांसारख्या पायाभूत सुविधांच्या विकासावर या देशांनी लक्षणीय गुंतवणूक व खर्च केला. आपल्याकडे वाहतुकीच्या सोयीस्कर साधनांच्या अभावामुळे ईशान्येकडील राज्ये इतर राज्यांच्या तुलनेत मागे पडली होती. पण अलीकडील काळात ईशान्येकडील राज्यांबद्दल लोकांची उत्सुकता वाढवली आहे. पर्यटकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्यास येथे पर्यटन क्रांती होऊ शकते आणि परिसरातील लोकांना अधिकाधिक रोजगार उपलब्ध होऊन जनता सुखी होऊ शकते. पर्यटन हे आर्थिक विकास आणि रोजगारनिर्मितीचे सक्षम माध्यम मानले जाते. पर्यटन क्षेत्र हे देशातील सर्वोच्च सेवा उद्योगांपैकी एक आहे. आजच्या काळात अर्थव्यवस्था मजबूत करणे ही प्रत्येक देशाची पहिली गरज आहे. पर्यटनामुळे अनेक देशांची अर्थव्यवस्था याच उद्योगाभोवती फिरते. युरोपीय देश, किनारपट्टीवरील आफ्रिकन देश, पूर्व आशियाई देश, कॅनडा, ऑस्ट्रेलिया इत्यादी देशांच्या पर्यटन उद्योगामुळे अर्थव्यवस्था मजबूत झाल्या आहेत. श्रीलंकेसारख्या अनेक देशांमध्ये स्फोटक परिस्थिती निर्माण होण्यामागे पर्यटन उद्योग कोसळणे हे प्रमुख कारण असल्याचे समोर आले आहे.



पर्यटन क्षेत्राच्या विकासामुळे लोकांना रोजगार तर मिळतोच, शिवाय इतर प्रांतातून येणा-या लोकांचे राहणीमान, सभ्यता आणि संस्कृती यांची देवाणघेवाणही सुलभ होते. जागतिक स्तरावर, पर्यटन हे जगातील सर्वांत मोठे कमाईचे क्षेत्र बनले आहे. जागतिक स्तरावर सकल देशांतर्गत उत्पादनात ११ टक्क्यांपर्यंत योगदान पर्यटन क्षेत्राचे आहे. मात्र, भारतातील या क्षेत्राचे योगदान अजूनही केवळ ६.७ टक्के इतकेच आहे. भारताची तुलना इतर देशांशी करायची झाल्यास चीनमध्ये पर्यटनक्षेत्राचे अर्थकारणातील योगदान ८.६ टक्के आहे. श्रीलंकेत ते ८.८ टक्के, इंडोनेशियात ९.२ टक्के, मलेशियात १२.९ टक्के आणि थायलंडमध्ये १३.९ टक्के इतके आहे. याचाच अर्थ भारताचे हे शेजारील देश पर्यटनाबाबत आपल्यापेक्षा खूप पुढे आहेत. भारतात पर्यटन क्षेत्राचा जीडीपीमध्ये ६.२३ टक्के वाटा आहे; तर देशातील एकूण रोजगारामध्ये या क्षेत्राचे योगदान ८.७८ टक्के आहे. २०१४-१५ साली पर्यटन आणि हॉटेल्स यांची एकूण उलाढाल सुमारे २८ लाख कोटी रुपयांच्या आसपास होती. २०२५ सालापर्यंत हीच उलाढाल ५८ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचू शकते. या उद्योगात जवळजवळ २ कोटी मनुष्यबळ गुंतलेले आहे. अर्थातच हा आकडा यापेक्षाही निश्चितच जास्त आहे. कारण या उद्योगामुळे अप्रत्यक्षपणे असंख्य जणांना रोजगार मिळत आहे. २०२२ मध्ये सुमारे ६२ लाख परदेशी पर्यटकांनी भारताला भेट दिली. गेल्या वर्षी जम्मू-काश्मीरमध्ये सर्वाधिक पर्यटक आले होते. देशातील धार्मिक स्थळांवरही पर्यटकांची गर्दी असते.

पर्यटन उद्योगाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारने नवीन पर्यटन धोरण २०२३ तयार केले आहे. यामुळे भारतातील पर्यटन क्षेत्राला नवे रूप मिळण्यास मदत झाली आहे. केंद्र सरकारने २०३० पर्यंत पर्यटन उद्योगातून ५६ अब्ज परकीय चलन मिळवण्याचे आणि पुढील सात वर्षांत १४० दशलक्ष नोक-या निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. पर्यटनाला चालना देताना निसर्गाचेही रक्षण करावे लागेल. पर्यटनस्थळांवर कचरा आणि प्रदूषण होणार नाही हेही पाहावे लागेल. पर्यटन वाढवण्यासाठी प्रेक्षणीय स्थळे, निसर्गसौंदर्य, प्राचीन कलाकृती, स्थापत्यकला यांकडे पाहण्याची दृष्टी आणि त्यासंदर्भातील माहितीचे आकलन करून घेण्याची वृत्ती विकसित करावी लागेल. देशात परदेशी पर्यटकांना लुटण्याचे किंवा विदेशी महिलांची छेड काढण्याचे प्रकार अभावाने का होईना पण घडत असतात. त्यांना आळा घालण्यासाठीही ठोस पावले उचलावी लागतील. परदेशी पर्यटकांची सुरक्षा हे आमचे ध्येय आहे, असा संदेश जागतिक पटलावर देण्याची जबाबदारी समाजाची आणि शासनाची आहे. तरच विदेशी पर्यटकांना भारतातील सफारी सुरक्षित वाटू शकेल. २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्यात पर्यटन उद्योगाचा विकास मोठी भूमिका बजावेल. यामुळे अर्थव्यवस्थेला खूप मोठ्या प्रमाणात बळ मिळेल यात शंका नाही.

# हवामान बदलामुळे मुंबईकरांना 'ब्रॉन्काइटिस'चा धोका, अशी घ्या स्वतःची काळजी

शहरातील तापमानाचा पारा आता हळूहळू उतरत आहे. त्यामुळे थंडीला सुरुवात झाल्याने शहरातील सर्वच भागांत सकाळी व सायंकाळी गारठा वाढत आहे. शहरातील हवेची गुणवत्ता ढासळल्याने प्रदूषणात वाढ होत आहे.या दोन्हींचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत असून, सर्दी-खोकल्याच्या रुग्णांत मोठी वाढ झालेली आहे. परिणामी, श्वसनाच्या आजाराबरोबरच ब्रॉन्काइटिसचाही त्रास वाढत आहे.वाढत्या प्रदूषणाचा फटका लहान मुले, तरुण व वृद्धांमध्येही खोकल्याचे प्रमाण दिसून येत आहे. सर्दी-खोकला बऱ्याच कालावधीपर्यंत औषधोपचार घेऊनही बरा होत नसल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. खराब हवामान व प्रदूषणामुळे सध्या नागरिकांमध्ये श्वसनाच्या आजाराबरोबरच व ब्रॉन्काइटिसचाही त्रास वाढत आहे. रोगप्रतिकारक क्षमता कमी असणाऱ्या नागरिकांमध्ये हा त्रास प्रामुख्याने आढळून येत आहे. जेव्हा खोकला तीन ते चार दिवसांपेक्षा अधिक असतो, तेव्हा त्याला 'अप्पर रेस्पिरेटरी ट्रॅक इन्फेक्शन' असे म्हटले जाते. या प्रकारचा खोकला कोरड्या प्रकारचा असतो. अशा वेळी रुग्णाला साध्या खोकल्याच्या औषधे दिली जातात. चार ते पाच दिवसांपेक्षा जास्त दिवस खोकला राहिल्यास ब्रॉन्काइटिसचा धोका असू शकतो. त्यासाठी वेळीच काळजी घ्यावी, असे तज्ज्ञांनी सांगितले.एक ते दोन आठवडे खोकला राहणे, खोकल्याची तीव्र उबळ , येणे, दम लागणे, खोकल्यातून कफ पडणे. ही लक्षणे आहेत.कोणाला होऊ शकतो?लहान मुले व ज्येष्ठ नागरिक, धुळीत किंवा उघड्यावर काम करणारे नागरिक, रोगप्रतिकारक क्षमता कमी असणारे नागरिक, या लोकांना होऊ शकतो. काय काळजी घ्यावी?बाहेर पडताना मास्क वापरावा, थंड पदार्थांचे सेवन टाळावे, रोगप्रतिकारक क्षमता उत्तम राहील याची काळजी घ्यावी, धूम्रपान टाळावे.काय उपाय करावे? खोकला जास्त दिवस राहिल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधोपचार घ्यावेत, खोकला झाल्यावर नियमित वाफ घ्यावी, पाणी जास्त प्यावे, संतुलित आहार घ्यावा, लर्जी असणाऱ्या गोष्टी टाळाव्यात.



# मोदी सर्व काही वैयक्तिकरित्या घेतात

नवी दिल्ली : भारत आणि मालदीवमधील राजनैतिक वाद सध्या सुरू आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी इमोशनल फोबिया क्रिएट करतात, असे म्हणत काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी टोला हाणला आहे.मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी सर्व काही वैयक्तिकरित्या घेत आहेत. आपण आपल्या शेजा-यांशी चांगले संबंध ठेवले पाहिजेत. वेळेनुसार काम केले पाहिजे. नरेंद्र मोदी इमोशनल फोबिया क्रिएट करतात. दरम्यान, मालदीवच्या युवा मंत्रालयातील उपमंत्री मालशा शरीफ, मरियम शिउना आणि अब्दुल्ला महझूम मजीद यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या लक्षद्वीप दौ-यावर भाष्य केले होते. यानंतर मालदीव सरकारने तिघांच्या वक्तव्यावर नाजारी व्यक्त करत त्यांना मंत्रीपदावरून निलंबित केले. काय केले होते भाष्य? मालशा शरीफ, मरियम शिउना आणि अब्दुल्ला महझूम मजीद यांनी लक्षद्वीपला भेट दिल्यानंतर पंतप्रधान मोदी यांच्या विरोधात टिप्पणी केली होती. लक्षद्वीप हा केंद्रशासित प्रदेश मालदीवला पर्यायी पर्यटनस्थळ म्हणून सादर करण्याचा प्रयत्न केला जात आहे असा आरोप त्यांनी केला होता.मालदीव सरकारने काय म्हटले? मालदीवच्या परराष्ट्र मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे की, मालदीव सरकारला विदेशी नेते आणि उच्चपदस्थ लोकांविरुद्ध सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर केलेल्या अपमानास्पद टिप्पण्यांबद्दल माहिती आहे. ही मते वैयक्तिक आहेत आणि मालदीव सरकारच्या विचारांचे प्रतिनिधित्व करत नाही. दरम्यान, मालदीवच्या भारतातील राजदूताला सोमवारी परराष्ट्र मंत्रालयात बोलावण्यात आले. यादरम्यान भारताने पंतप्रधान नरेंद्र मोदींविरोधात केलेल्या वक्तव्यावर तीव्र चिंता व्यक्त केली. त्याचवेळी, माले येथील मालदीव सरकारने भारतीय उच्चायुक्त मुनू मुहावर यांना सांगितले की, नरेंद्र मोदींवरील टिप्पणी सरकारची भूमिका दर्शवत नाही.



# सफरचंद की संत्री? मधुमेहाच्या रुग्णांसाठी कोणती फळे फायदेशीर? डॉक्टर म्हणाले

उळरलशींशी उळशीं: मधुमेहाचे रुग्ण संत्री किंवा सफरचंद खाऊ शकतात का? जाणून घ्या डॉक्टरांकडून मधुमेह ही समस्या जगभरात चिंतेचा विषय ठरत आहे. दिवसेंदिवस याचे रुग्ण वाढत आहेत. बदलती जीवनशैली आणि चुकीच्या पद्धतीने खाणे, पिणे अशा अनेक कारणांमुळे लोक मधुमेहाचे बळी ठरत आहेत. मधुमेह हा एक गंभीर आणि लवकर बरा न होणारा आजार आहे. त्यामुळे अनेकांना मधुमेह आणि मधुमेहपूर्व आजाराबरोबर जगताना रक्तातील साखरेची पातळी संतुलित ठेवावी लागते. त्यासाठी खाण्या-पिण्याच्या सवयींकडे विशेष लक्ष द्यावे लागते.अनेक जण काही फळे मधुमेहावर फायदेशीर असल्याचा सल्ला देतात. विशेषतः हिवाळ्यात संत्री आणि सफरचंद मोठ्या प्रमाणात उपलब्ध असतात. त्यामुळे यातील कोणती फळे मधुमेहाच्या रुग्णांसाठी चांगली, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. याच विषयावर अपोलो रुग्णालयाच्या मुख्य पोषण तज्ज्ञ डॉ. प्रियंका रोहतगी यांनी द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना मधुमेहाच्या रुग्णांनी आहारात कोणत्या फळाचा कशा प्रकारे समावेश करावा याविषयी माहिती दिली आहे. दरम्यान, कोणत्याही फळाचे आरोग्यदायी फायदे त्याच्या आकार आणि सेवनावर अवलंबून असतात. कारण- फळातील कॅलरीज लक्षात घेऊन, ते किती प्रमाणात सेवन केले पाहिजे हे ठरवावे लागते. तसेच कोणतेही फळ सेवन करताना त्यात १५ ग्रॅमपेक्षा जास्त कर्बोदके नसावीत. अशा वेळी हिवाळ्यात मधुमेहाच्या रुग्णांनी सफरचंद किंवा संत्री खाणे कितपत फायदेशीर ठरू शकते ते जाणून घेऊ..मधुमेह ते हृदयविकार, दालचिनीचे सेवन करण्याचे 'हे' पाच जबरदस्त फायदे तुम्हाला माहितेय का? डॉक्टर काय सांगतात? वाचामधुमेहाच्या रुग्णांसाठी सफरचंद खरचं फायदेशीर ठरु शकते का?सफरचंदांमध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते; जे साखरेच्या पचनाची क्रिया मंद करते आणि रक्तातील ग्लुकोजची पातळी अचानक वाढ होण्यापासून रोखते. त्यामुळे तुम्हाला जास्त काळ पोट भरल्यासारखे वाटते. सफरचंदातील पॉलिफेनॉल इन्सुलिन निर्मितीसाठी जबाबदार असलेल्या बीटा या पेशींची झीज रोखतात. शरीरातील कर्बोदकांचे प्रमाण नियंत्रित ठेवायचे असेल, तर लहान आकाराचे सफरचंद खा. कारण- लहान सफरचंदांमध्ये सुमारे १५ ग्रॅम कर्बोदके असतात. सफरचंदाबरोबर थोडीशी प्रथिने किंवा हेल्दी फॅट्स वाढवण्याचा विचार करीत असाल, तर तुम्ही मूठभर डायफ्रूट्स किंवा पनीरचा तुकडा खाऊ शकता.एका मध्यम आकाराच्या सफरचंदात चार ग्रॅम फायबर असते. तसेच मध्यम आकाराच्या एका सफरचंदात ८.३७ मिग्रॅ इतके क जीवनसत्त्व असते. सफरचंदाच्या सालींमध्ये हृदयाचे संरक्षण करणारे अँटिऑक्सिडंट्स असतात. ३६ ग्लायसेमिक इंडेक्स आणि सहा ग्लायसेमिक असलेल्या सफरचंदांमध्ये साखरेचे प्रमाण खूप कमी असते.संत्र्याच्या सेवनाने मधुमेहाचे प्रमाण नियंत्रणात राहते का?लिंबूवर्गीय फळांमध्ये समाविष्ट असलेले संत्रे हे फळ मधुमेहाच्या रुग्णांसाठी खूप फायदेशीर मानले जाते. फायबर आणि जीवनसत्त्वाने समृद्ध या फळात ग्लायसेमिक इंडेक्स ३१ ते ५० च्या दरम्यान असतो. मध्यम आकाराच्या संत्र्यामध्ये साधारणपणे १५ ग्रॅम कर्बोदके असतात. दररोज एका मध्यम संत्र्याचे सेवन केल्यास तुम्हाला एका दिवसाला आवश्यक असलेले जीवनसत्त्व क (६३ मिलिग्रॅम) मिळेल.एका मध्यम संत्र्यामध्ये फोलेट (२४ ाlस) असते; जे लाल रक्त पेशी तयार करण्यास मदत करते आणि पोटॅशियम (२३८ ास); जे रक्तदाब नियंत्रित करते.दोन्ही फळांचे सेवन करण्यासाठी सर्वोत्तम वेळ कोणती?दोन्ही फळे उत्तम आहाराचा भाग म्हणून किंवा स्नॅक्स म्हणून खाणे आरोग्यदायी ठरू शकते. ही फळे रक्तातील साखरेचे वाढते प्रमाण रोखण्यास मदत करतात. पण रिकाम्या पोटी फळे खाणे टाळा; विशेषतः झोपायच्या आधी. कारण- यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण लवकर वाढू शकते. जर तुम्ही दिवसाच्या सुरुवातीला या फळांचे सेवन करीत असाल, तर तुमच्या शरीरातील नैसर्गिक साखरेवर प्रक्रिया करण्यासाठी जास्त वेळ मिळतो.मधुमेहाच्या रुग्णांनी फळं खाण्यापूर्वी लक्षात ठेवाव्यात 'या' गोष्टी :१) लहान आकाराची फळे निवडा : आपल्या आहारातील कर्बोदकांचे सेवन प्रभावीपणे व्यवस्थापित करण्यासाठी लहान आकाराची फळे निवडणे गरजेचे आहे. तसेच फळाचा आकार मोठा असल्यास त्याचे लहान लहान तुकडे करा.२) ज्यूसपेक्षा असेच फळ खा : फळांचा ज्यूस बनवण्यापेक्षा असेच संपूर्ण फळ खा; ज्यामुळे त्यातील फायबरचे प्रमाण तसेच ठेवता येते.३) समतोल राखण्यासाठी फळांची पेअरिंग करा : फळ खाताना त्याबरोबर थोडे प्रोटीन आणि हेल्दी फॅट्सने समृद्ध पदार्थ खाण्याचा प्रयत्न करा. त्यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण संतुलित करता येऊ शकते; तसेच आहारातही समतोल राखता येतो.



# अल्झायमर्स आणि कर्करोगावर उपचारपद्धती लवकरच भारतात?

देशात योनीमार्गाच्या मुखाच्या कर्करोगाला प्रतिबंध करण्यासाठी एचपीव्ही लसीकरण कार्यक्रम आखण्यात आला आहे. यासह इतर अनेक उपचार पद्धती या वर्षात क्रांतिकारी बदल घडविणाऱ्या ठरणार आहेत. नेमक्या कोणत्या आहेत या उपचार पद्धती?अल्झायमर्स आणि कर्करोगावर या वर्षात नवीन उपचारपद्धती भारतात उपलब्ध होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मोठा बदल घडणार आहे. कार-टी पेशी अथवा रोगप्रतिकारक पेशींचा वापर रक्ताच्या कर्करोगावरील उपचारासाठी करण्याची उपचार पद्धती स्वस्तात जास्तीत जास्त लोकांना उपलब्ध होणे आवश्यक आहे. देशात योनीमार्गाच्या मुखाच्या कर्करोगाला प्रतिबंध करण्यासाठी एचपीव्ही लसीकरण कार्यक्रम आखण्यात आला आहे. यासह इतर अनेक उपचार पद्धती या वर्षात क्रांतिकारी बदल घडविणाऱ्या ठरणार आहेत. नेमक्या कोणत्या आहेत या उपचार पद्धती?एमआरएनए लशींना पहिल्यांदा करोना संकटाच्या काळात परवानगी मिळाली. संशोधक या लशींचा वापर कर्करोगावरील उपचारासाठी वापर करण्यावर संशोधन करीत आहेत. मात्र, कर्करोगावरील प्रमाण उपचारपद्धती म्हणून त्यांना अद्याप मंजुरी मिळालेली नाही. असे असले तरी सुरुवातीच्या वैद्यकीय चाचण्यांमध्ये त्यांचे चांगले परिणाम हाती आले आहेत. एमआरएनए आधारित लशींचा वापर फुप्फुस, स्वादुपिंड, त्वचा, चेता पेशी, डोके, मान आणि प्रोस्ट्रेटच्या कर्करोगांवर करण्याच्या सुमारे २५ हून अधिक वैद्यकीय चाचण्या करण्यात आल्या आहेत. या लशींमुळे कर्करोग होण्यापासून बचाव होत नाही. मात्र, कर्करोगाच्या पेशींच्या विरोधात लढण्यासाठी प्रतिकारशक्ती मिळते. त्यामुळे पुन्हा कर्करोग होण्याचा धोका या उपचारामुळे कमी होण्यास मदत होते.'अल्झायमर्स'वरील लिकेनमॅब औषधाला मागील वर्षात मंजुरी देण्यात आली आहे. या रोगावर आतापर्यंत कोणतेही औषधोपचार उपलब्ध नव्हते. या रोगाचे मूळ शोधण्याचे काम संशोधक अद्याप करीत आहेत. 'अल्झायमर्स'च्या रुग्णांमध्ये बिटा-अमायलॉइड प्रथिनाचे प्रमाण कमी होत असल्याचे एमआरआय तपासण्यांमध्ये स्पष्ट दिसून येते. हे औषध हे प्रथिन कमी होण्याची प्रक्रिया रोखते. याचबरोबर एली लिली कंपनीचे डोनॅनमॅब हे औषधही हीच क्रिया करते. मात्र, त्याच्या अजूनही वैद्यकीय चाचण्या सुरू आहेत. याचबरोबर सिनॅप्टिक प्लास्टिसिटी (चेतीपेशी समूहांच्या परस्पर संबंधांत सुधारणा करणे), चेतापारेषण रिसेप्टर्स आणि शरीराचा प्रतिकारशक्ती प्रतिसाद या उपचार पद्धतींवर सध्या संशोधन सुरू आहे. तसेच वजन कमी करण्याचे सेमॅग्लुटिड औषध चेतापेशी, प्रतिकारशक्ती प्रतिसाद आणि रक्तवाहिन्यांची स्थिती यात सुधारणा करण्यासाठी वापरता येईल का, यावरही संशोधन सुरू आहे. सिकल सेल आणि थॅलेसिमिया मागील वर्षी नोबेल पुरस्कार विजेत्या क्रिस्पर तंत्रज्ञानावर आधारित उपचार पद्धतीला मंजुरी मिळाली. सिकल सेल आणि बेटा थॅलेसिमिया यांच्यावरील उपचारासाठी क्रिस्परचा वापर होत आहे. मात्र, या तंत्रज्ञानावर आधारित उपचार पद्धतींची ही केवळ सुरुवात आहे. क्रिस्पर थेरपॅटिक्स कंपनी टाईप-१ मधुमेह, हृदयविकार यावरील उपचारासाठी या तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर काम करीत आहेत. या जनुकीय रचनेत बदल करण्याच्या रचनेतून कर्करोगावरील कार-टी उपचार विकसित केले जाऊ शकतात. सध्या आधुनिक उपचार पद्धतीमध्ये रुग्णाच्या शरीरातील रोगप्रतिकारक पेशी काढून तिच्यावर प्रयोगशाळेत सुधारणा केली जाते. कर्करोगाच्या पेशी ओळखून त्यांना नष्ट करता येईल, अशा प्रकारे ही सुधारणा केली जाते. मात्र, ही उपचार पद्धती प्रत्येक रुग्णासाठी स्वतंत्रपणे करावी लागत असल्याने ती खर्चिक आहे. क्रिस्परमुळे वैश्विक कार-टी उपचार पद्धती विकसित होऊ शकतात.भारतात कर्करोगावर कार-टी उपचार पद्धती? आयआयटी मुंबई आणि टाटा मेमोरिअयल रुग्णालयाने विकसित केलेल्या कार-टी पेशी उपचार पद्धतीला भारत सरकारने मंजुरी दिली आहे. अनेक रुग्णालयांकडून या पद्धतीचा स्वीकार करण्यात आला आहे. त्यामुळे पुन्हा कर्करोगाचा धोका निर्माण होणाऱ्या रुग्णांमध्ये अधिकाधिक प्रमाणात या पद्धतीने उपचार या वर्षात होताना दिसतील.




## कामगार कायद्यांचा लाभ घेण्यासाठी कामगारांनी संघटित होण्याची गरज - उदगीर येथील कामगार जागृती मेळाव्यात कामगार नेते राजकुमार होळीकर यांचे आवाहन

उदगीर : केंद्र सरकारने कामगार हिताचे अनेक कायदे रद्द केले आहेत. सरकार कामगार विरोधी धोरण राबवत आहे. त्यामुळे कामगारांनी व असंघटित कामगारांनी संघटित होऊन संघर्ष करून शासकीय कायद्या अंतर्गत असलेल्या योजनाचा लाभ घ्यावा..असे आवाहन अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार होळीकर यांनी येथे केले. उदगीर येथील सराफ गल्ली, हिंगुलांबिका देवी मंदिराच्या सभागृहात अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेच्या वतीने आयोजित कामगार जागृती मेळाव्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून राजकुमार होळीकर हे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उदगीरचे माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे उर्फ सावकार हे होते. यावेळी भाजप महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष उत्तराताई कळबुर्गे, उस्मानाबाद जनता बँकेचे संचालक सुभाष धनुरे, माजी नगरसेवक नरसिंग शिंदे, लातूर येथील पत्रकार शिवाजी कांबळे, किशोर कांबळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. हमाल मापाडी, घरेलू कामगार, बांधकाम कामगार, विविध उद्योगागातील कामगार यांनी संघटित झाले पाहिजे. त्यांनी आपली नोंदणी करून शासनाच्या उपलब्ध योजना, सवलतीचा लाभ घेतला पाहिजे. कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी, मुलीच्या लग्नासाठी, घरकुलासाठी, प्रसूतीसाठी अशा विविध कल्याणकारी योजनांसाठी अनुदानाची तरतूद आहे. असे सांगून होळीकर यांनी कामगार कायदे, योजना व आपण त्याचा लाभ कसा घेतला पाहिजे याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. त्यानंतर भाजप महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा उत्तराताई कळबुर्गे यांनी केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनाचा लाभ कामगारांना मिळावा यासाठी आम्ही अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेसोबत आहोत. असे आपल्या भाषणात सांगितले. तर पत्रकार शिवाजी कांबळे यांनी सद्याचे युग माहितीचे युग असून कामगारांनी आपल्या कुटुंबाच्या प्रगतीसाठी विविध योजना सवलतीबद्दल माहिती घेऊन त्याचा लाभ पदरात पाडून घ्यावा, असे आवाहन केले. तर अध्यक्षीय भाषणात माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे म्हणाले, अखिल महाराष्ट्र कामगार संघटना खूप चांगले काम करत आहे. कामगारांनी नोंदणी करून घ्यावी, योजनेचा लाभ मिळण्यासाठीचे सर्व कागदपत्रे जमा करावीत, सरकार कोणाचेही असो कसे लाभ देत नाही, ते मी पाहतो. कामगारांच्यासाठी लढणार्या अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेला उदगीरमध्ये सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन निटुरे यांनी दिले. होळीकर यांनी खूप चांगले मार्गदर्शन आपणास केले, त्यांच्या मार्गदर्शनाखाली आपण विविध योजनांचा लाभ घेतला पाहिजे. असेही सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसन्नचलन नितीन एकुर्केकर यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेचे तालुकाध्यक्ष अरुण उजेडकर, रामभाऊ काळे, सौ.आरती शेटकार, शिल्पा काळे, प्रीती काळे व इतर पदाधिकार्यांनी परिश्रम घेतले.




# हिवाळ्यात शेंगदाणे करतील निरोगी राहण्यास मदत; जाणून घ्या याचे आश्चर्यकारक फायदे

अनेकदा प्रवासात लोक शेंगदाणे खाऊन टाइम पास करतात. हिरवी मिरची आणि काळे मीठ घालून शेंगदाणे खाण्याची मज्जाच वेगळी आहे. पण हिवाळ्यात याचे सेवन केल्याने किती फायदे होतात हे तुम्हाला माहिती आहे का?लहान दिसणारे शेंगदाणे हे पोषक तत्वांचे भांडार आहे. त्यात कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डीसह इतर आवश्यक पोषक घटक आढळतात. चला तर मग जाणून घेऊया तज्ज्ञांकडून हिवाळ्यात शेंगदाणे खाण्याचे काय फायदे आहेत.शेंगदाणे खाण्याचे फायदे शेंगदाणे ही प्रोटीनची पॉवर बँक आहे. यामध्ये २० अमीनो ऍसिड वेगवेगळ्या प्रमाणात आढळतात. हे पेशींच्या निर्मितीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. शेंगदाण्यामध्ये निरोगी मोनोसॅच्युरेटेड फॅट्स असतात जे हार्मोन्सला स्टिम्युलेट करतात, ज्यामुळे तुम्हाला दीर्घकाळ समाधान वाटते.शेंगदाण्याचे सेवन केल्याने त्वचा निरोगी राहते. व्हिटॅमिन बी ३ आणि नियासिन सारख्या पोषक तत्वांमुळे त्वचेवरील सुरकुत्या मुक्त होण्यास मदत होते.शेंगदाण्यामध्ये नियासिन जास्त प्रमाणात असते आणि त्याशिवाय त्यात व्हिटॅमिन ई असते जे अल्झायमरसारख्या आजारांना दूर ठेवण्यास मदत करते. गर्भवती महिलांना शेंगदाणे खाण्याचा फायदा होऊ शकतो कारण त्यात फोलेट असते. हे गर्भाच्या निर्मिती आणि विकासासाठी उपयुक्त आहेत. बाळाच्या न्यूरल ट्यूबच्या विकासासाठी देखील हे महत्वाचे आहे, जे मेंदू आणि स्पाइनल कॉर्डच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.मधुमेह असणाऱ्या व्यक्ती देखील त्यांच्या आहारात शेंगदाण्याचा समावेश करू शकतात कारण यामध्ये साखर नसते. अशाप्रकारे चवीबरोबरच आरोग्यासाठीही स्नॅक्ससाठीचा शेंगदाणे हा उत्तम पर्याय आहे.शेंगदाण्यांचा रोजच्या आहारात समावेश केल्यास लहान मुलांच्या योग्य वाढीसाठी आवश्यक असणारा प्रोटीनचा पुरवठा होण्यास मदत होईल.



# आमदार शेखर निकम यांच्या माध्यमातून आंबव पोंक्षे गावातील विकास कामांचे भुमीपुजन ग्रामस्थांच्या उपस्थितीत संपन्न

संगमेश्वर/ प्रतिनीधी: संगमेश्वर तालुक्यातील मौजे आंबव पोंक्षे गावात आमदार शेखर निकम यांच्या माध्यमातून शासनाच्या विविध विकास योजनेंतर्गत मंजूर असलेल्या गावातील रस्त्यांच्या खडीकरण डांबरीकरणाचे भुमीपुजन ग्रामस्थ, गावचे सरपंच, उपसरपंच, सदस्य, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. गेली अनेक वर्षांपासून आंबव पोंक्षे गावातील रस्त्यांची अवस्था दळणवळणासाठी अत्यंत बिकट झाली होती. रस्त्यांची कामे होणेसाठी गावातील ग्रामस्थांनी आमदार शेखर निकम यांचेकडे निवेदन देवून रस्त्यांची कामे होणेबाबत आग्रही मागणी केली. गावातील रस्त्यांची झालेली दूरावस्था पाहता आमदार निकमा यांनी आपल्या विकास फंडातून या कामांसाठी निधी उपलबद्ध करून दिला. यामध्ये आंबव पोंक्षे मुख्य रस्ता ते कदमवाडी रस्ता डांबरीकरण करणे (६ लाख), आंबव पोंक्षे मुख्य रस्ता ते सुतारवाडी कोष्टेवाडी न्हावीवाडी बौद्धवाडीकडे जाणारा रस्ता डांबरीकरण करणे (८ लाख), आंबव पोंक्षे मुख्य रस्ता ते बौद्धवाडी कोष्टेवाडी सुतारवाडीकडे जाणारा रस्ता डांबरीकरण करणे (६ लाख)इजिमा ६१ ते आंबव भुवडवाडी पकडेवाडी सुतारवाडी जोड रस्ता ग्रामा १५८ खडीकरण व डांबरीकरण करणे (१० लाख), आंबव पोंक्षे जूनी मराठी शाळा ते जूवळेवाडीकडे जाणारा रस्ता डांबरीकरण करणे (८ लाख), आंबव पोंक्षे जूवळेवाडीकडे जाणारा रस्ता डांबरीकरण करणे(८ लाख) ही कामे मंजूर केली. त्यांचे भुमीपुजन ग्रामस्थांच्या बहुसंख्य उपस्थितीत पार पडले. आंबव पोंक्षे गावामध्ये विकास कामांसाठी आमदार निकम यांनी याआधी लाखो रुपयांचा विकास निधी दिला आहे, त्याबद्दल ग्रामस्थांनी व लोकप्रतिनिधींनी आमदार शेखर निकम यांचे आभार मानले. यावेळी सरपंच शेखर उकार्डे, उपसरपंच मंगेश मांडवकर, ग्रा. प. सदस्य सुनिल घडशी, निधी भायजे, गावप्रमुख मोहन भुवड, रत्नागिरी जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस युवा कार्याध्यक्ष सुशील भायजे, धामापूर तर्फे संगमेश्वर जि. प. गटाचे विभाग अध्यक्ष महेश बाष्टे, तालुका सचिव सुबोध चव्हाण, संजय कदम, राजेंद्र जाधव, तानाजी धुलप, दिपक जाधव, विश्वास सुवरे, दिपक शिगवण, प्रथमेश निकम, प्रविण भुवड, दाजी भुवड, दत्ताराम शिगवण, विश्राम भुवड, संजय सुतार, चेतन साळवी, तुकाराम कदम, शांताराम जुवळे, गणपत बोले, राजाराम जुवळे, अशोक बोले, सचिन मायनाक, सुरेश जुवळे, प्रकाश धुलप, देवजी भायजे, दत्ताराम सुतार, अशोक कदम, दत्ताराम जाबरे, श्रद्धा गुरसळे, अनंत पकडे, नंदकुमार मायनाक, राजाराम मायनाक, किरण भायजे, विजय पकडे, संजय पकडे ,संतोष कदम, संतोष मांडवकर, शांताराम जुवळे, देवजी भायजे, सुरेश भुवड, गोविंद पकडे, संदिप घडशी, सुरेश मांडवकर, तुकाराम घडशी, केदार गोटेकर, दत्ताराम घडशी, संजय पांचाळ, सुप्रिया सुतार, महादेव जाधव, मोहन भुवड, मनोज गुरसळे, नंदू नेटके, संतोष सुतार, योगेश सुतार, शरद जाधव, प्रकाश कदम, संतोष विभुते, विजय पकडे, चंद्रकांत सुतार, पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ आदि उपस्थित होते.



# जिल्ह्यात आतापर्यंत २६,९२४ नवमतदारांची नोंदणी

लातूर : प्रतिनिधी भारत निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार १ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रासह मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षणाचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत २२ जानेवारी रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. जिल्ह्यात आतापर्यंत १८ ते १९ वर्षे वयोगटातील २६ हजार ९२४ नवमतदारांची नोंदणी झाली आहे.भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार २७ ऑक्टोबरला जिल्ह्यात प्रारुप मतदार यादी जाहीर करण्यात आली. त्या नंतर नवमतदारांची नोंदणी तसेच मयत व दुबार नावे वगळणे, मतदान कार्ड, पत्त्यात दुरूस्ती अशा कामांसाठी ९ डिसेंबरची मुदत देण्यात आली होती. या अर्जावर २६ डिसेंबरपर्यंत कार्यवाही करण्यात आली मात्र केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्रासह देशातील १२ राज्यांमध्ये ही मुदत आता १२ जानेवारी केली आहे तर अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यासाठी २२ जानेवारी ही तारीख निश्चित केली आहे.या दरम्यान दुबार नावे तसेच मयतांची नावे वगळणे हे काम प्रामुख्याने करण्याचे निर्देश सर्व जिल्हा निवडणूक अधिका–यांना देण्यात आले आहेत. त्या सोबतच नवमतदारांनाही नोंदणीसाठी संधी देण्यात येणार आहे त्यामुळे अंतिम मतदार यादी आता ५ जानेवारीऐवजी २२ जानेवारी रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. २२ जानेवारीनंतरही मतदार यादीमध्ये नाव नसलेल्या पात्र नागरिकांनी मतदार यादीत नाव नोंदविण्याची संधी मिळणार आहे तरी अद्याप नाव न नोंदविलेल्या पात्र व्यक्तींनी मतदार यादीत नाव नोंदविण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी केले आहे.




# लातूर शहरामधील बहुतांश विद्युत पोलवरील पथदिवे गेल्या तीन महिन्यापासून अनेक भागात बंद आहेत.

लातूर :– लातूर शहरामधील बहुतांश विद्युत पोलवरील पथदिवे गेल्या तीन महिन्यापासून अनेक भागात बंद आहेत. याबाबत संबंधित विभागातील लाईट विभागातील कर्मचाऱ्याकडे तक्रार केली असता बंद असलेले पथदिवे कार्बन काढून काम तात्पुरते स्वरूपात सुरू केले जात आहेत. परंतु कार्बन काढल्याने केवळ १ ते २% टक्के एवढेच पथदिवे चालू होत आहेत.अन्य बंद असलेले पथदिवे मात्र बंद अवस्थेतच आहे.त्यामुळे शहरातील अनेक पथदिवे बंद असलेल्या अवस्थेत असल्याने नागरीकांना अंधाराचा त्रास सहन करावा लागत आहे. सदरील पथदिवे दुरूस्तीचे काम एका खासगी एजन्सी मार्फत येत होते.मात्र गेल्या तीन महिन्यापासून एजन्सीने पथदिवे साहित्याचा पुरवठा बंद केला आहे.यामुळे लातूर शहरातील पथदिवे दुरूस्ती काम ठप्प होण्याच्या मार्गावर असून लातूर शहर अंधारात जाण्याची दाट शक्यता आहे.शहरातील प्रभाग निहाय बंद असलेल्या पथदिव्यांची विद्युत विभागाकडून क्षेत्रीय कार्यालयानिहाय यादी करावी.व सदरील विषयांची गांभीर्याने दखल घेऊन वरील विषय त्वरीत मार्गी लावावा अन्यथा नागरीकासहीत आंदोलन करण्यात येईल असे निवेदन माजी नगरसेविका सौ.इरशाद तांबोळी, राष्ट्रवादी अर्बन सेलचे डी.उमाकांत यांनी नमूद केले आहे.



# सभासद आणि ऊसउत्पादकांसाठी ऊसलागवड योजना–२०२४

लातूर : प्रतिनिधी टवेन्टिवन शुगर्स, मळवटी ता. जि.लातूर येथील साखर कारखाना कार्यक्षेत्रातील सभासद आणि ऊसउत्पादक शेतक–यांसाठी सन २०२४–२०२५ या गळीत हंगामाकरीता ऊसलागवड योजना राबविणार आहे. या योजनेअंतर्गत को. ८६०३२, एम.एस.१०००१, कोसी.६७१, कोव्हीएसआय ०८००५, कोव्हीएसआय १८१२१ या सुधारीत जादा साखर उतारा देणा–या मान्यताप्राप्त जातींच्या उसाची लागवड फेब्रुवारी २४ ते मार्च २४ मध्ये करणा–या शेतक–यांकरिता कारखान्यातर्फे गाळपास आलेल्या ऊसास एफआरपी पेक्षा प्रतिटन १०० रुपये जादा ऊसदर देण्याचे जाहीर करण्यात आले आहे.राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी पुढील गळीत हंगामासाठी कारखाना कार्यक्षेत्रात जास्तीत जास्त ऊस लागवड होऊन गाळप क्षमते इतका ऊस निर्माण होण्यासाठी ऊस लागवड योजना–२०२४ जाहीर केली आहे. टवेन्टिवन शुगर्स, मळवटी ता. लातूर येथील साखर कारखाना कार्यक्षेत्रातील सभासद आणि ऊसउत्पादक शेतक–यांसाठी ही योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेअंतर्गत लागवड ऊसाचे १२ महीन्यात गाळप करुन ऊसाला प्रतिटन १०० रुपये एफआरपी पेक्षा अधिक ऊसदर देण्यात येणार आहे. या योजनेत जास्तीत जास्त सभासद व ऊसउत्पादकांनी सहभाग घ्यावा असे आवाहन त्यांनी केले आहे. या ऊसलागवड योजना २०२४–२०२५ अंतर्गत कार्यक्षेत्रातील सभासद व सर्व ऊसउत्पादकासाठी आहे.

# दैनिक महावृत्त चा दणका, नवी मुंबई महानगरपालिकेने बेलापूर ते नेरूळ मुख्य रस्त्यावरील चेंबर्सला रातोरात झाकण लावले

नवी मुंबई / के. एच. हनवते :– (नमुंमपा) महानगरपालिकेच्या हलगर्जीपणा मुळे फुटपाथधारकांना किंवा दुचाकी वाहकांना जिवमुटीत घेऊन प्रवास करावा लागत होता याची बातमी दैनिक महावृत्त वर्तमानपत्रात झळकली. याची खबरदारी महापालिकेने त्वरीत घेतली व रातोरात चेंबर्सवर झाकण लावले त्याबद्दल (नमुमपा) अधिकारी व कर्मचाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन. नुकतेच (नमुमपा) शेजारील सिबीडी बेलापूर ते नेरूळ या मुख्य रस्त्यावर नवीन ब्रिज बनवण्यात अले परंतू सडक फुटपाथची दुरवस्था आशी झालेली आहे की, सडक आणि फुटपाथ दोन्ही लेवल एकच आसल्याने आणि त्यातील ४०/५० चेंबर्स ला झाकनच नसल्यामुळे त्या ठिकाणाहून ये जा करणाऱ्या प्रवाशांना किंवा दुचाकी वाहन चालकांना जिवमुटीत घेऊन प्रवास करावा लागत आहे या संदर्भात दैनिक महावृत्त वर्तमान पत्रात बातमी प्रसिद्ध झाली व त्या संदर्भात लक्ष वेधून घेतल्याने रातोरात (नमुमपा) अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सुधारणा केली. त्याबद्दल दैनिक महावृत्त नवी मुंबई पत्रकार के. एच. हनवते यांनी नमुमपा अधिकारी व कर्मचाऱ्यांचे या प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर अभिनंदन केले.




# उल्हासनगर येथे व्हॉइस ऑफ मीडिया कडुन जिल्ह्यातील पत्रकारांचा सन्मान

उल्हासनगर / प्रतिनिधी : ६ जानेवारी या पत्रकार दिनाचे औचित्य साधुन व्हॉइस ऑफ मीडिया ठाणे जिल्हा कार्यकरणीच्या वतीने ८ जानेवारी रोजी जिल्ह्यातील सर्व पत्रकारांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यामध्ये व्हॉइस ऑफ मीडियाचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांच्या हस्ते सन्मानपत्र देवुन पत्रकारांचा गौरव करण्यात आला. या वेळी पत्रकारिता क्षेत्रातील काही दिग्गज पत्रकारांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले . सदर कार्यक्रम उल्हासनगर कँप ३ येथील डॉ . बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिकेतील सभागृहात संपन्न झाला. ६ जानेवारी हा दिवस पत्रकार दिन म्हणुन साजरा करतात. तर याच दिनाचे औचित्य साधुन व्हॉइस ऑफ मीडिया ठाणे जिल्हा कार्यकरणीच्या वतीने ८ जानेवारी २०२४ रोजी जिल्ह्याच्या सर्व तालुक्यातील पत्रकारांचा सन्मान सोहळा आयोजित केला होता. या सोहळ्याला राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे , प्रदेश कार्याध्यक्ष योगेंद्र जोरकर , उल्हासनगर महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर, ज्येष्ठ पत्रकार दिलीप मालवणकर , बदलापुर चे माजी नगराध्यक्ष राम पातकर , मध्यवर्ती रुग्णालयाचे सिव्हिल सर्जन डॉ. मनोहर बनसोडे, प्रदेश संघटक ( महिला विंग ) सोनल बशिरे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणुन उपस्थित होते . संदीप काळे यांनी या वेळी व्हॉइस ऑफ मीडियाची वाटचाल व पत्रकारांच्या हिता साठी ही संघटना कशी काम करते या बाबत पंचसुत्री कार्यक्रम समजावुन सांगितला. तर दिलीप मालवणकर यांनी पत्रकाराना चांगले मार्गदर्शन केले . या पत्रकार सन्मान सोहळ्यात जिल्ह्यातील ११० पत्रकाराना सन्मानपत्र, पेन डायरी देवुन त्यांचा गौरव करण्यात आला. हा सन्मान सोहळा अत्यंत देखण्या स्वरूपात संपन्न झाला असुन व्हॉइस ऑफ मीडियाचे कल्याण तालुका जगदिश खंबाळे , मुरबाड तालुका अध्यक्ष मंगल डोंगरे , शहापुर तालुका अध्यक्ष राजेश जागरे , भिवंडी तालुका अध्यक्ष अशोक पाटोळे , उल्हासनगर तालुका अध्यक्ष अशोक शिरसाट, अंबरनाथ तालुका अध्यक्ष अशोक नाईक , तसेच ठाणे शहर तालुका अध्यक्ष तुषार रसाळ हे आपल्या पदाधिकाऱ्यासह कार्यक्रमाला उपस्थित होते. या सुंदर कार्यक्रमाचे आयोजन चांगल्या स्वरुपात केल्या मुळे संदीप काळे यांनी ठाणे जिल्हा कार्यकारणीचे कौतुक केले. दरम्यान हा कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न केल्या मुळे उल्हासनगर तालुका कार्यकरणीचे मनपुर्वक अभिनंदन करण्यात आले. या सन्मान सोहळ्यात ठाणे जिल्हा कार्यकरणीच्या वतीने ज्येष्ठ पत्रकार दिलीप मालवणकर , ज्येष्ठ पत्रकार सुधीर भाऊ पोतदार, फारुक मेनन, नितेश डोंगरे यांचा जीवन गौरव पुरस्कार देवुन सन्मानित केले असुन पत्रकार स्व बाळ जगे यांना मरणोत्तर पुरस्काराने सन्मानित केले आहे. व्हॉइस ऑफ मीडिया चे ठाणे जिल्हा अध्यक्ष अरुण ठोंबरे यांची कोकण व मुंबई विभागीय अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याने त्यांच्या जागी ठाणे जिल्हा अध्यक्ष म्हणुन रामेश्वर गवई यांची नियुक्ती संदीप काळे यांनी केली आहे. तर किरण रोहिदास यांची ठाणे जिल्हा महिला अध्यक्ष पदी नियुक्ती केली आहे. तर या कार्यक्रमासाठी जिल्हा कार्याध्यक्ष जाफर वणु , उपाध्यक्ष सुरेश जगताप , कैलास साबळे, कार्यवाहक विजय सिंग , समन्वयक जॉनी डेविड, कमाल शेख , सलिम मंसुरी यांनी अथक प्रयत्न केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अनिल कौटेकर व जिल्हा प्रवक्ता अरुण बैकर यांनी उत्तमरित्या केले असुन आभार प्रदर्शन अरुण ठोंबरे यांनी केले आहे.




# दर्पणदिनी कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, माहिती व जनसंपर्क संघटनेच्या वतीने पत्रकारांचा सन्मान

लातूर (प्रतिनिधी): मराठी पत्रकार दिनानिमित्त कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, नि.माहिती व जनसंपर्क संघटनेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात सन्मान करण्यात आला. जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात कार्यक्रम पार पडला. यावेळी ज्येष्ठ पत्रकार रामराव गवळी, संपादक जयप्रकाश दगडे, जिल्हा मराठी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष यावेळी सन्मान करण्यात आला. प्रत्येकाने ध्येयनिष्ठ पत्रकारिता करावी. नितीमुल्य जपत वंचित समाजाला विकासाच्या प्रवाहात आणावे. समाजाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी मुल्याधिष्ठित पत्रकारितेची गरज असल्याचे मत गवळी यांनी मांडले. तर शासनाच्या विविध कल्याणकारी योजना पत्रकारांसाठी महासंघाचे जिल्हाध्यक्ष नितीन बनसोडे, जिल्हा माहिती कार्यालयाचे दिलीप वाठोरे, संजीवकुमार सूर्यवंशी, भरत सूर्यवंशी, किशोर गायकवाड यांनी पुढाकार घेतला. पत्रकारांचा सन्मान कार्यक्रमात विविध माध्यमातील संपादक, जिल्हा प्रतिनिधी, प्रतिनिधी यांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये श्री. गवळी, श्री.




नृसिंह घोणे, विभागीय माहिती कार्यालयाचे सहायक संचालक (माहिती) डॉ. श्याम टरके, कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे जिल्हा सरचिटणीस अशोक माळगे, शिक्षक संघटनेचे अध्यक्ष सुभाष मस्के, कायदेशीर सल्लागार ॲड. राम गजधने आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. पुष्पहार अर्पण करुन मान्यवरांनी प्रतिमेस अभिवादन केले. संघटनेच्या वतीने उपस्थित पत्रकारांची मान्यवरांच्याहस्ते आहेत. त्याचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रत्येकाने संघटित होऊन जनजागृती करावी, असे मत दगडे यांनी मांडले. जांभेकरांच्या जीवनचरित्रावर माळगे यांनी प्रकाश टाकला. कास्ट्राईबच्या भूमिकेबाबत मस्के यांनी माहिती दिली. कास्ट्राईब व कर्मचारी संघटनांना पत्रकार बांधव सातत्याने पाठबळ देत असल्याबद्दल पत्रकारांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. कास्ट्राईबचे जिल्हा संघटक नागरत्न कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. तर शिक्षक संघटनेचे मानकुसकर यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी कास्ट्राईब कर्मचारी दगडे, श्री. घोणे, अशोक चिंचोले, चंद्रकांत झेरीकुंठे, मधुकर चलमले, महादेव कुंभार, अभय मिरजकर, दीपरत्न निलंगेकर, श्रीधर स्वामी, दिगांबर तारे, काकासाहेब गुट्टे, हरिश्चंद्र जाधव, चंद्रकांत इंद्राळे, विनोद चव्हाण, प्रभाकर शिरुरे, मुरली चेंगटे, शिवाजी कांबळे, धोडर्डीराम ढगे, अशोक हनवते, पंडित हणमंते, शिवाजी जडे, लिंबराज पन्हाळकर, अफसर कारभारी, शेख महेताब, लहु शिंदे, रामकिसन नादरगे, राजाभाऊ जाधव, पंकज जेस्वाल आदिंचा समावेश होता.


PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE